कर्तव्यस्थानी दिलेल्या शासकीय निवासस्थानासाठी अनुज्ञप्ति शुल्काची वसुली .....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः घभाव-२०२२ /प्र.क्र.०७/२०२२/सेवा-५
खो.क्र.३३५ (विस्तार), तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १९ जानेवारी, २०२३.

वाचा-

१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :सीपीओ-१४७८/सी. आर.-३२७/सेवा-५, दि.१७ एप्रिल, १९७८
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :वेपूर-१२८७/६४३/ सेवा-१०, दि.२५ एप्रिल, १९८८
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :घभाव-१४८९/४०/सेवा-५, दि.३० डिसेंबर, १९९१
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :घभाव-२०००/प्र.क्र.९७/२०००/सेवा-५, दि.१७ फेब्रुवारी, २००१
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :घभाव-१००४/प्र.क्र.२८/सेवा-५, दि.२१ सप्टेंबर, २००६
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक :घभाव-२०१०/प्र.क्र.४/सेवा-५, दि.१४ मार्च, २०११
७) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :घभाव-२०१०/प्र.क्र.४/सेवा-५, दि.१९ एप्रिल, २०११

शासन निर्णय

मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ खंड १ मधील नियम ८४९(बी) च्या तरतुदीनुसार कर्तव्यस्थानी दिलेल्या शासकीय निवासस्थानासाठी शासकीय कर्मचाऱ्यांस त्यांच्या वित्तलब्धीच्या १० टक्के किंवा निवासस्थानाचे प्रमाणित भाडे ह्यापैकी जे कमी असेल तेवढे अनुज्ञप्ती शुल्क द्यावे लागते.

२. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतनसंरचना लागू करण्यात आली आहे. या सुधारणा लक्षात घेता शासकीय निवासस्थानाच्या अनुज्ञप्ती शुल्काच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. यासंबंधीच्या सर्व बाबींचा विचार करुन शासन असे आदेश देत आहे की, शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनसंरचनेनुसार कर्तव्यस्थानी पुरविलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या शासकीय निवासस्थानांसाठीचे अनुज्ञप्ती शुल्काचे दर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे असतील व ते सर्व राज्यभर एकरुपतेने लागू असतील. संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनानुरुप निवासस्थानाच्या पात्रतेचा विचार न करता प्रत्यक्षात ताब्यात असलेल्या निवासस्थानाच्या प्रकारासाठी अनुज्ञप्ती शुल्काची वसुली केली जाईल.

तक्ता

अ.क्र.	कर्मचाऱ्यास अनुज्ञेय असलेला वेतन स्तर (रुपये)	अनुज्ञेय निवासस्थानाचा प्रकार	अनुज्ञेय चटईक्षेत्र (चौरस फूट)	अनुज्ञप्ती शुल्काचा ठराविक दर (रुपये दरमहा)
१	२	३	४	५
१	एस-१ ते एस-५	एक	२२० पर्यंत	२४०
२	एस-६ ते एस-१०	दोन	२२१-३२०	५२०

Scanned with CamScanner

३	एस-११ ते एस-१३	तीन	३२१-४२०	८८०
४	एस-१४ ते एस-२०	चार	४२१-५५०	११६०
५	एस-२१ ते एस-२५	पाच	५५१-७५०	१८४०
६	एस-२६ व त्याहून अधिक	सहा	७५१-१११० व त्याहून अधिक	२८००

३. अनुज्ञप्ती शुल्काचे वरील सुधारित दर दिनांक १ फेब्रुवारी २०२३ पासून अंमलात येतील.

४. काही शासकीय निवासस्थानांना सेवकांसाठी निवासव्यवस्था आणि/अथवा स्वतंत्र वाहनतळ, छप्पर असलेली किंवा छप्पर नसलेली जागा (गॅरेज) जोडलेली असते. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ फेब्रुवारी २०२३ पासून मुख्य निवासस्थानांच्या धारकाकडून सेवकाच्या निवास व्यवस्थेसाठी व चार चाकी वाहनाच्या वाहनतळासाठीच्या अतिरिक्त जागेसाठी खालीलप्रमाणे स्वतंत्र शुल्काची वसुली करण्यात यावी:-

अ.क्र.	मुख्य निवासस्थानाबरोबरची अतिरिक्त जागा	शुल्काचा दर (रु. दरमहा)
१	सेवकाचे निवासस्थान	२४०
२	स्वतंत्र वाहनतळ (गॅरेज)	२४०
३	वाहनासाठी छप्पर असलेली जागा	१६०
४	वाहनासाठी उघडी जागा	८०

५. वर परिच्छेद २ मध्ये विहित केलेल्या दराने करावयाच्या अनुज्ञप्ती शुल्काच्या वसुली शिवाय सेवा शुल्काची स्वतंत्र वसुलीही तशीच चालू ठेवण्यात यावी. शासनाने असेही ठरविले आहे की, दिनांक १ फेब्रुवारी २०२३ पासून विद्यमान सेवा शुल्क दुप्पट करण्यात यावे. प्रत्येक निवासस्थानासाठी किंवा निवासस्थानाच्या समुहांसाठी सेवा शुल्काचे सुधारित दर दर्शविणारे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत स्वंतत्रपणे निर्गमित केले जातील.

६. मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील ह्यासंबधातील सध्याच्या तरतुदी या आदेशाच्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आल्या आहेत असे समजले जावे. या नियमांना औपचारीक सुधारणा ,यथावकाश करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०११९११४९००९८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने. VINAYAK ARVIND DHOTRE

(वि. अ. धोत्रे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव	निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

Scanned with CamScanner

मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्री यांचे सचिव
सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य
मंत्रालयीन सर्व विभाग
सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई
सचिव, मा.सभापती, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई
सचिव, मा.अध्यक्ष, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई
मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा),मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई.
सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई
आयुक्त राज्य माहिती आयोग,(सर्व)
सचिव राज्य निवडणूक आयोग,मुंबई.
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/ औरंगाबाद.
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे-रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४,राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,मुंबई ४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३
इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५
नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-३)

पृष्ठ ४ पैकी ३

Scanned with CamScanner

संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई, सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.	

Scanned with CamScanner